# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

बंधू-भगिनींनो,

कामगारांच्या प्रलंबित असलेल्या सवलतींबाबत प्रत्येक JCM मध्ये कर्मचारी संघटनेने उठविलेला आवाज, सातत्याने केलेला पत्रव्यवहार व पाठपुरावा तसेच मॅनेजमेंटच्या आढमुठ्या धोरणाबाबत कर्मचारी संघटनेबरोबर सर्व मान्यताप्राप्त युनियन्सच्या कर्मचाऱ्यांनी संपूर्ण ओएनजीसीत केलेल्या आंदोलनामुळे झुकलेल्या मॅनेजमेंटने काही सवलतींच्या ऑर्डर्स नुकत्याच काढलेल्या असून या मिळालेल्या सवलतींमुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यापुढेदेखिल कामगारांच्या इतर प्रलंबित असलेल्या सवलतींबरोबरच 2004 चा MOU हा विषय कर्मचारी संघटनेसाठी अतिशय गंभीर व महत्वाचा असून 2004 च्या MOU मुळे नुकसान झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी कर्मचारी संघटना पूर्ण ताकतीनीशी प्रयत्न करणार असून लवकरच कामगारांना दिलासा देणारा निर्णय अपेक्षीत आहे.

2004 चा MOU तसेच कामगारांच्या सवलतींबाबत गेली अनेक वर्ष कर्मचारी संघटना करीत असलेल्या प्रयत्नांचा घटनाक्रम व हा सारा प्रवास ओएनजीसीतील कामगारांच्या समोर असताना, ज्यांच्या या साऱ्या प्रवासात काडीचाही सहभाग नाही. तसेच ही मंडळी या विषयासाठी कधीच रस्त्यावर उतरली नाही वा कधी मॅनेजमेंटला एक पत्रही ज्यांनी लिहीलेले नाही अशी मंडळी या साऱ्या विषयाचे श्रेय अत्यंत बेशरमपणे व खोडसाळपणे स्वत:कडे घेऊ पहात आहेत. पेट्रोलियम मिनीस्टरला निवेदन देतानाच यातून काहीही निष्पन्न होणार नाही याची ठाम कल्पना असताना काहीतरी स्टंट करुन एका रात्रीत हिरो बनण्याचा या धुर्त मंडळींचा डाव होता. परंतू या घटनेला बराच काळ निघून गेल्यानंतर देखिल काहीच हालचाल न झाल्यामुळे पेट्रोलियम मिनीस्टरनी त्यांच्या निवेदनाला केराची टोपली दाखवली आहे हे जगजाहीर झाले. आता हि मंडळी अस्वस्थ झालेली असून हा सारा प्रकार कामगारांच्या लक्षात आल्यानंतर देखिल संभ्रम निर्माण करुन हे सारे आम्हीच केले हे सांगण्याचा लाजीरवाणा प्रयत्न करीत आहेत.

या धूर्त मंडळींनी स्वत: काहीही न करता सारे श्रेय आपल्याकडे घेण्याचा जो खोडसाळपणा चालविलेला आहे त्याबददल कामगारांमध्ये या बनवाबनवी बददल प्रचंड नाराजी आहे व त्याची सारी किंमत येणाऱ्या निवडणूकीत त्यांना मोजावी लागणार आहे. या मंडळींच्या अशा प्रकारच्या कृत्यामुळे मागील दोनही निवडणूकीत आम्हीच जिंकणार असे छातीठोकपणे सांगणारे व विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी सारी जय्यत तयारी केलेल्या या नेतेमंडळींचा यांनी कधी स्वप्नातही विचार केला नाही असा दारुण पराभव स्विकारावा लागला आहे. आपण सगळे सुशिक्षित व सुज्ञ आहात व परिस्थितीचे आकलन करण्याची क्षमता नव्या पिढीत आहे. त्यामुळे या धुर्त नेत्यांना ओळखण्यास आपण चूक करणार नाही याची आम्हाला खात्री आहे. आपल्या भक्कम एकजुटीमुळे व पाठिंब्यामुळे भविष्यात कर्मचारी संघटना अभुतपूर्व यश मिळविल्याशिवाय रहाणार नाही.

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !     कामगार एकता झिंदाबाद !!**

दि. १२ ऑगस्ट २०१६

(प्रदीप मयेकर)
सरचिटणीस